प्रासंगिक

# शेतकरीही आहे कोरोना योद्धा!

## अनेक संकटं परतवून लावत सुरू आहे लढाई...



सतीश देशमुख
अध्यक्ष : इंटेलेक्च्युअल्स फोरम, पुणे
(मो.नं. ९८८१४९५५१८)





कोरोनाच्या या काळात शेतकऱ्यांना एकामागून एक संकटांच्या मालिकांना तोंड द्यावे लागत आहे. सुरुवातीला 'चिकनमुळे कोरोनाचा प्रादुर्भाव होतो' अशा अफवेमुळे पोल्ट्री उद्योगाचे अतोनात नुकसान झाले. लॉकडाऊनच्या काळात आलेली पिके, भाजीपाला, फळे विक्री विस्कळीत झाली. काही जणांनी या संकटाचे इष्टापत्तीत रूपांतर करण्यासाठी 'फळे-भाजीपाला बास्केट' संकल्पना राबवून, शहरातील सोसायटींशी संधान जुळवून थेट विक्रीचा प्रयत्न केला. त्याला फारसे यश आले नाही. हे सारे विपरित चित्र बघता शेतकरी सर्व आघाड्यांवर निकराची लढाई करतो आहे, असेच म्हटले पाहिजे.

वर्तमानपत्रे, वृत्तवाहिन्या तसेच त्यांच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या जाहिरातींमध्ये आणि राजकीय स्वरुपाच्या भाषणांमध्ये कोरोनाच्या युद्धात डॉक्टर, नर्सेस, सफाई कर्मचारी, पोलिस यांचे कौतुक होत होते. परंतु जीवाची जोखीम घेऊन जीवनावश्यक वस्तू जसे- धान्ये, फळे, दूध, भाजीपाला पुरवठा करणाऱ्या अन्नदात्याचा सर्वांना विसर पडला होता. तेव्हा मी सोशल मीडियावर 'शेतकरी- कोरोना वॉरियर्सनाही माझा सलाम' अशा पोस्ट टाकल्या. इतरांचे वर्क फ्रॉम होम असताना शेतकरी मात्र वर्क ऑन फील्ड आहे. महाराष्ट्राच्या मा. मुख्यमंत्र्यांनी अलिकडेच जनतेशी संवाद साधताना कोरोनाच्या संकटकाळात दिवसरात्र राबून अन्न-धान्य पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना मी विनम्र नमस्कार करतो, असे म्हटल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो.



कोरोनाच्या या काळात शेतकऱ्यांना एकामागून एक संकटांच्या मालिकांना तोंड द्यावे लागत आहे. सुरुवातीला 'चिकनमुळे कोरोनाचा प्रादुर्भाव होतो' अशा अफवेमुळे पोल्ट्री उद्योगाचे अतोनात नुकसान झाले. लॉकडाऊनच्या काळात आलेली पिके, भाजीपाला, फळे विक्री विस्कळीत झाली. काही जणांनी या संकटाचे इष्टापत्तीत रूपांतर करण्यासाठी 'फळे-भाजीपाला बास्केट' संकल्पना राबवून, शहरातील सोसायटींशी संधान जुळवून थेट विक्रीचा प्रयत्न केला. त्याला फारसे यश आले नाही. हे सारे विपरित चित्र बघता शेतकरी सर्व आघाड्यांवर निकराची लढाई करतो आहे, असेच म्हटले पाहिजे.

युरोपियन देशातील निर्यात बंद झाल्यामुळे द्राक्षाच्या निर्यातीमध्ये ३० हजार टन घट झाली व द्राक्ष उत्पादकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

निर्यात करार झालेली दहा टन साखर ट्रांजिटमध्ये व बंदरातच अडकली.

कापूस पणन खरेदी केंद्रांवर अडीच किलोमीटर लांब रांगा दिसून येत होत्या. अपुरे केंद्र, ग्रेडर्स यामुळे संथगतीने चाललेल्या खरेदीमुळे अजूनही शेतकऱ्यांचा कापूस भिजतोय तरी संपूर्ण खरेदी झालेली नाही. ऐन पेरणीच्या वेळी आवश्यकता असताना त्यांचे ६४७ कोटी रुपयांची चुकारे रखडले होते.

गेले चार महिने जनावरांचा बाजार भरत नसल्यामुळे साधारण तीन हजार कोटी रुपयांच्या उलाढालीवर त्याचा परिणाम झाला आहे.

'कोरोना'च्या संकटकाळात ग्रामीण भागातील शेतकरी १७ ते २२ रुपये प्रतिलिटरप्रमाणे दुधाची विक्री करीत आहेत; तर नाईलाजाने शहरात विस्थापित झालेला त्यांचीच भावंड ४८ रुपये प्रतिलिटर दूध खरेदी करीत आहे. लॉकडाऊनचे कारण सांगून खासगी व सहकारी दूध संघ कमी दराने खरेदी करीत आहेत. मात्र ग्राहकांना मात्र तेच भाव ठेवले आहेत. दोन लाख टन साठा उपलब्ध असताना दहा हजार टन दूध पावडर आयात करण्याचा दुर्दैवी निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे.


तिकडे असे सारेच दुर्दैवी चित्र आहे. कांदा उत्पादकांना सहा रुपये किलोप्रमाणे भाव मिळत आहे.

मध्यंतरी एका चॅनेलने टोमॅटोवरील विषाणूच्या अतिरंजित अफवा पसरवल्या. त्यांच्यावर काहीच कारवाई झाली नाही. अशा वेळी कृषी विद्यापीठांनी तत्परतेने चाचणी करून प्रेस नोट काढून शास्त्रीय स्पष्टीकरण देणे अपेक्षित होते. पण झोपलेल्यांना कोण उठवणार?

कोकणाला निसर्गाचे वरदान लाभल्यामुळे तेथील एक मुख्य आर्थिक स्त्रोत पर्यटन आहे. पण कोरोनामुळे समुद्रकिनारे ओस पडले आहेत. त्यानंतर येऊन

कोसळले चक्रीवादळ. कित्येक वर्षांपासून जोपासलेल्या फळबागा कोलमडून पडल्या.

तिकडे मराठवाडा, विदर्भ, खान्देशमध्ये बोगस बियाणांमुळे सोयाबिनची उगवण न झाल्यामुळे दुबार पेरणीची वेळ आली आहे. बीजपरीक्षण तपासणीमध्ये एक लाख क्विंटल बियाणे नापास झाले आहे. सावकारांकडून कर्ज घेऊन एवढ्या मेहनतीने पेरणी केल्यानंतर अर्धवट उगवलेल्या पिकांवर किंवा भाव मिळत नसल्यामुळे बहरून आलेल्या पिकांवर नांगर फिरताना शेतकऱ्यांना काय दुःख होत असेल?



गेल्या चार महिन्यांत सर्व औद्योगिक कंपन्या, दुकाने, झगमगणारे मॉल्स बंद असल्यामुळे ग्रामीण भागात चोवीस तास वीजपुरवठा करणे सहज शक्य होते. पण तसे झाले नाही.

ग्रामीण भागात सगळ्यांकडे स्मार्टफोन नसतो. असला तर दोन मुलांमध्ये एकच असतो. अखंडित वीज पुरवठ्यामुळे चार्जिंग नसते. इंटरनेट मंद असते. दुर्गम भागात रेंज येत नाही. ४६० रुपयाचे नेट पॅक परवडत नाही. अशा असंख्य प्रश्नांमुळे ग्रामीण भागात ऑनलाईन शिक्षणच नापास झाले आहे.

पेट्रोल डिझेलचे भाव गगनाला भिडल्यामुळे ट्रॅक्टर, शेतमाल वाहतुकीचा खर्च प्रचंड वाढला आहे.

मान्सून पेरणी खरिपासाठी एकूण ४५ हजार कोटी उद्दिष्टापैकी फक्त बारा हजार कोटी रुपयांचे बँकेने कर्ज वाटप केले आहे. राष्ट्रीयीकृत बँकांनी तर फक्त १४.६ टक्केच उद्दिष्ट पूर्ण केले आहे. केंद्राची किसान क्रेडिट कार्ड योजना अपयशी ठरली आहे. ३१ लाख शेतकऱ्यांचे अर्ज बँकेने नामंजूर केले आहेत.

मध्यंतरी स्थानिक स्वराज्य निवडणूक आचारसंहितेमुळे सहा जिल्ह्यात कर्जमाफी लाभार्थींची यादी जाहीर झाली नव्हती व नंतर कोरोनामुळे कर्जमाफीची प्रक्रिया पूर्ण पणे रखडलेली आहे.

'मागेल त्याला काम' असे कायदेशीर बंधन असले तरी 'मनरेगा'चे फॉर्म क्रमांक ४ भरून दिले तरी स्वीकारले जात नाहीत. तो वेगळा मोठा विषय आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत केंद्राने राज्याला अंमलबजावणी आराखड्याचे फक्त ३९२० कोटी रुपयेच मंजूर केले होते. दुर्दैवाची बाब ही की डिसेंबर २०१९ पर्यंत, त्यापैकी फक्त ३४ टक्के म्हणजे १३३८ कोटी रुपये खर्ची पडले आहेत. आज ग्रामीण भागात, ३९०६८ लोकसंख्येच्या मागे एक प्राथमिक केंद्र आहे. कोरोनाचा सामना करण्यासाठी आरोग्य सुविधा अत्यंत तटपुंजी आहे.

अशा रितीने पिकांना अचानक लागणाऱ्या किडीपासून ते टोळधाडीपर्यंत, शेतात धुडगूस घालणाऱ्या रानडुकरांपासून ते दहशत पसरवणाऱ्या बिबट्यांपर्यंत, दुष्काळाच्या अवर्षणापासून ते जमीन खरडून काढणाऱ्या महापुरापर्यंत, नफेखोर व्यापाऱ्यांपासून ते उद्योगपतींपर्यंत, तलाठ्यांपासून ते काही भ्रष्ट उच्चाधिकाऱ्यांपर्यंत, नाकारलेल्या तंत्रज्ञानापासून ते कायद्याच्या बेड्यांच्या पारतंत्र्यापर्यंत, तीन वर्ष रखडलेल्या कर्जमाफीच्या गाजरापासून ते आता केंद्राच्या कागदी पॅकेजच्या भोपळ्यांपर्यंत – सर्व संकटांचा सामना करीत शेतकरी योद्धा उभा आहे.

'जय जवान, जय किसान' अशा घोषणा देऊन आता आमच्या घशाला कोरड पडली आहे. पण शेतकऱ्यांना सन्मान मिळत नाही. त्यांच्या दररोज १२ आत्महत्या होत असताना त्याची दखल आजकाल माध्यमे फारशी घेताना दिसत नाहीत.

मी आवाहन करतो की शोषण करणाऱ्या व्यवस्थेशी असफल झुंज देऊन आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना १५ ऑगस्टच्या ग्रामसभेमध्ये, दोन मिनिटे श्रद्धांजली अर्पण करूनच मगच सभेला सुरुवात करावी. ■